अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

(स्वायत्त महाविद्यालय)

# NOTICE

नोटीस क्र. 72 दिनांक: ०८/०६/२०२२

## वरिष्ठ महाविद्यालय

## प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

एफ.वाय.बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी./ बी.एस्सी.कॉम्प्युटर सायन्स/ बी.बी.ए./ बी.बी.ए (सी.ए.)/ बी.व्होक. [(1) फुड प्रोसेसिंग अॅण्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी, , (2) जर्नालिझम अँण्ड मास कम्युनिकेशन , (3) डेअरी टेक्नॉलॉजी, (4) रिटेल मॅनेजमेंट, (5) ई.कॉमर्स, (6) नेटवर्किंग अॅण्ड सिस्टिम अॅडमिनिस्ट्रेशन] इ.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रवेश प्रक्रिया दि. ०९/०६/२०२२ पासून ऑनलाईन पध्दतीने व खालील नियमांनुसार सुरू होत आहे. यासाठी प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील फ्लो चार्ट, माहिती पुस्तक व संबंधित नोटीसेस काळजीपूर्वक वाचाव्यात. जेणेकरून प्रवेश घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. विद्यार्थ्यांनी प्रवेश कसा घ्यावा यासाठी या नोटीस सोबतचा चार्ट अगोदर अवश्य वाचावा नी काळजीपूर्वक ऑनलाईन फॉर्म भरावा.

प्रथम वर्षास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारातून माहितीपत्रक घ्यावे त्यावरील युजर व पासवर्ड च्या सहाय्याने ऑनलाईन (www.tccollege.org ) प्रतिक्षा यादी व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. प्रतिक्षा अर्जाचा नंबर स्वत:जवळ लिहून ठेवावा. सदर नंबरचा उपयोग प्रवेश घेतेवळी अर्ज डाउनलोड करताना वापरावयाचा आहे. चलन नं. प्राप्त झालेनंतर प्रवेश फी **२४ तासांच्या** आत भरून आपला प्रवेश निश्चित करावा.

१. **एफ.वाय.बी.ए. :-** आपल्याच महाविद्यालयामध्ये इ. १२ वी कला मध्ये प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये थेट प्रवेश सुरू आहे.

इतर महाविद्यालयामधून इ. १२ वी कला **५० टक्केच्या** पुढे गुणप्राप्त केलेल्या व प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध कोटयानुसार अनुदानित तुकडीमध्ये थेट प्रवेश सुरू आहे. तसेच विनाअनुदानित तुकडीमध्ये थेट प्रवेश सुरू आहेत.

२. **एफ.वाय.बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स :-** सदर कोर्स हा विनाअनुदानित तत्वावर आहे. इ.१२ वी सायन्सने बोर्डाच्या परीक्षेत किमान **५५ टक्के गुण** मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेने प्रवेश मिळेल. (यासाठी १२ वी सायन्समध्ये **मॅथ्स्.** विषय असणे आवश्यक आहे)

३. **बी.व्होक.:- (I)जर्नालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशन (II) रिटेल मॅनेजमेंट (III) ई-कॉमर्स अॅण्ड डिजिटल मार्केटिंग (IV) नेटवर्किंग अॅण्ड सिस्टिम अॅडमिनिस्ट्रेशन- (V) डेअरी टेक्नॉलॉजी** इ. १२ वी मध्ये किमान ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध कोटयानुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

४. **एफ.वाय.बी.बी.ए. / एफ.वाय.बी.बी.ए.(सी.ए.):-** इ. १२ वी मध्ये किमान **६० टक्केच्या** पुढे गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध कोटयानुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

५. **एफ.वाय.बी.एस्सी . :-** आपल्याच महाविद्यालयामध्ये इ. १२ वी शास्त्र प्रथम प्रयत्नामध्ये **५० टक्केच्या** पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये दि. २२/०६/२०२२ पर्यंत उपलब्ध कोटयानुसार थेट प्रवेश सुरू आहे.

इतर महाविद्यालयातून इ. १२ वी शास्त्र ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज दि.०९/०६/२०२२ ते दि. २१/०६/२०२२ रोजी सायं. ५ पर्यंत भरावेत. दि. २२/०६/२०२२ रोजी प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांची यादी जात संवर्गाप्रमाणे वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल. या यादीनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दि.२५/०६/२०२२ पर्यंत प्रवेशाची सर्व प्रक्रिया पूर्ण करून व ऑनलाईन फी भरून आपला प्रवेश निश्चित करावा.

६. **एफ.वाय.बी.कॉम . :-** आपल्याच महाविद्यालयामध्ये इ. १२ वी वाणिज्य प्रथम प्रयत्नामध्ये ६० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये दि. २२/०६/२०२२ पर्यंत उपलब्ध कोटयानुसार थेट प्रवेश सुरू आहे. **इंग्रजी माध्यमाची तुकडी विनाअनुदानित असेल याची नोंद घ्यावी.**

इतर महाविद्यालयातून इ. १२ वी वाणिज्य ६० टक्केच्या पुढे गुणप्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज दि.०९/०६/२०२२ ते दि. २१/०६/२०२२ रोजी सायं. ५ पर्यंत भरावेत. दि. २२/०६/२०२२ रोजी प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांची यादी जात संवर्गाप्रमाणे वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल. या यादीनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दि.२५/०६/२०२२ पर्यंत प्रवेशाची सर्व प्रक्रिया पूर्ण करून व ऑनलाईन फी भरून आपला प्रवेश निश्चित करावा.

७. **फुड प्रोसेसिंग अॅण्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी:-** इ. १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी **प्रतिक्षा यादी**चे ऑनलाईन अर्ज दि.०९/०६/२०२२ ते दि. २१/०६/२०२२ रोजी सायं. ५ पर्यंत भरावेत. दि. २२/०६/२०२२ रोजी प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांची यादी जात संवर्गाप्रमाणे वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल. या यादीनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दि.२५/०६/२०२२ पर्यंत प्रवेशाची सर्व प्रक्रिया पूर्ण करून व ऑनलाईन फी भरून आपला प्रवेश निश्चित करावा.

प्रवेश फी भरून प्रवेश निश्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज डाउनलोड करावा. डाउनलोड केलेला प्रवेश अर्ज प्रशासन भवन येथे जमा करावा.(या काळात प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशावरील आपला हक्क संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.)

## - प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -

१. इ. १२ वी शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या २ झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.
२. इ. १२ वी चे मूळ गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत
३. ई.बी.सी. /जात संवर्गाची फी सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर शासनाने दिलेल्या मुदतीत ऑनलाईन फॉर्म भरणे आवश्यक आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
४. पी.टी.एफ./एस.टी.एफ. फी सवलतीचा संपूर्ण भरलेले सही शिक्क्या निशी अर्ज प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक आहे. (फक्त अनुदानित वर्गासाठी)
५. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत
६. विद्यार्थ्यांचे आधार कार्डची झेरॉक्स
७. अलिकडच्या काळात काढलेला आयडेंटीटी कार्ड साईजचे २ फोटो

सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी त्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या किमान १५ झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात. ऑनलाईन प्रवेश घेत असताना प्रवेश अर्जावर स्वतःचा ई-मेल आय.डी. व वापरातील मोबाईल नंबर लिहिणे अनिवार्य आहे.

**Helpline No.:- 02112-223636, 9764790515**

[विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणेकरीता महाविद्यालयाने ग्रंथालयामध्ये निःशुल्क सेवा उपलब्ध करून दिलेली आहे. तरी, गरजू विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा]

प्रबंधक

चेअरमन
प्रवेश प्रक्रिया

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य